# नियमीत दिवाणी दावा क्र.११३/२०२३

## CNRNOMHOS120003402023

## ब्रम्हदेव वि. भागवत व इतर

## नि.क्र. २१ खालील आदेश

## (आदेश दि.२०/०३/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६ नियम १७ अन्वये दाव्यामधील दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे वादीने दावा हा त्याची दावा मिळकतीवरील मालकी हक्क घोषीत करुन मिळण्यासाठी तसेच दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादींकडून मिळण्यासाठी दाखल केला आहे. तथापि, वादीकडून अन्य मिळकती ज्याचे वर्णन प्रस्तुत अर्जामध्ये केलेले आहे त्या दाव्यामध्ये समाविष्ट करण्याच्या राहून गेल्या आहेत. त्याचप्रमाणे, काही मिळकती राजश्री भागवत गावडे यांच्या नावावर खरेदी केल्या आहेत त्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र. ५ म्हणुन दाव्यामध्ये समाविष्ट करण्याचे राहून गेलेले आहे. अशाप्रकारे दाव्यामध्ये राहिलेल्या मिळकती समाविष्ट करण्यासंदर्भात तसेच प्रतिवादी क्र. ५ म्हणुन राजश्री भागवत गावडे यांना समाविष्ट करण्यासंदर्भात व त्या अनुषंगाने दाव्याची आकारणी व त्यावरील कोर्ट फि यामध्ये होणारी दुरुस्ती करुन मिळण्यासाठी परवागनीचा अर्ज दाखल केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या सर्व मिळकती या प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ ते ४ व प्रस्तावित प्रतिवादी क्र. ५ राजश्री गावडे यांच्या नावावर खरेदी केल्या गेल्या असल्या तरीही त्या मिळकती खरेदी करण्यासाठी वादीनेच प्रतिवादींना रक्कमा दिल्या होत्या. अशा परिस्थीतीत त्या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर केला गेल्यास दाव्याच्या मुलभुत स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाला निशाणी क्र. २६ येथे म्हणणे दाखल करुन

हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादीने मुळ दाव्यामध्येच राजश्री भागवत गावडे हिला पक्षकार करणे गरजेचे होते. त्यामुळे वादीने याबाबतीत निष्काळजीपणा दाखविलेला आहे.त्याचप्रमाणे,प्रस्तुत दुरुस्ती अर्जाद्वारे वादी ज्या मिळकती मुळ दाव्यामध्ये समाविष्ट करु पाहत आहे त्या मिळकती दावा मिळकत ज्या गावामध्ये स्थीत आहेत त्याच गावातील आहेत. त्यामुळे वादीने प्रस्तावित मिळकती मुळ दाव्यात जाणुन-बुजुन समाविष्ट केले नाहीत हे शाबीत होते. वादीने दावा मिळकतीचे मुल्यांकन योग्य केले नसून त्यावर योग्य ती कोर्ट फि दिली नाही. वादीने प्रस्तुत म्हणण्याच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये नमूद केलेल्या मिळकती जाणुन-बुजुन दाव्यामध्ये समाविष्ट केल्या नाहीत. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केला गेल्यास प्रतिवादींचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. दाव्याचा निर्णय गुणदोषांवर होण्यासाठी प्रस्तुत अर्ज मंजुर होणे गरजेचे नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

४. वादीतर्फे विधिज्ञांनी अर्जातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. प्रतिवादी व त्याचे वकील युक्तीवादासाठी गैरहजर.

५. मुळ दावा हा वादीने मालकी हक्क घोषीत होवून दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादीकडून मिळण्यासाठी दाखल केला आहे. मुळ दाव्यातील महत्वाची कथने अशी आहेत की, प्रतिवादींनी दावा मिळकती त्यांच्या नावावर जरी घेतल्या असल्या तरी त्या वादीच्या पैशातुन घेतलेल्या आहेत. प्रस्तुत दुरुस्ती अर्जाद्वारे वादीने अन्य मिळकती ज्या प्रतिवादींनी त्यांच्या नावे खरेदी केल्या आहेत परंतु त्यासाठी वादीच्या पैशांचा वापर झालेला आहे त्या प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्यामध्ये समाविष्ट मिळण्यासंदर्भात दुरुस्ती मागीतली आहे. त्याचप्रमणे, राजश्री भागवत गावडे हिच्या नावे ज्या काही मिळकती खरेदी केल्या आहेत त्या मिळकतीसाठी देखील वादीच्या पैशांचा वापर केला गेला असल्यामुळे सदर राजश्री भागवत गावडे ही या दाव्यात आवश्यक पक्षकार असल्यामुळे

तिलादेखील प्रतिवादी क्र. ५ म्हणुन समाविष्ट करण्यासंदर्भात दाव्यात दुरुस्ती मागितली आहे. सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने दाव्याची आकारणी व कोर्ट फि यामध्ये अनुषंगीक दुरुस्ती मागितली आहे. सकृतदर्शनी वादीने दस्त ऐवज यादी नि.क्र. २४ सोबत नोंदणीकृत खरेदीखतांच्या व नोंदणीकृत करारनाम्याच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. सदर छायांकित प्रतींचे अवलोकन करता ती खरेदीखते व करारनामे हे प्रतिवादींच्या हक्कात झालेले दिसून येतात. सदरची खरेदीखत व करारनाम्यामधील मिळकती वादी हा प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकती म्हणुन समाविष्ट करुन मागत आहे. त्यातील काही मिळकती राजश्री भागवत गावडे यांच्या नावे खरेदी केल्याचे दिसून येते. या सर्व मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट झाल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये जो काही वाद आहे तो वाद एकाच दाव्यामध्ये सर्व मिळकतींबाबत निकाली काढणे न्यायोचित राहणार आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाला जी काही हरकत घेतली आहे त्याचादेखील विचार करता असे दिसून येते की, त्यांनी केवळ नव्याने समाविष्ट करु पहात असलेल्या मिळकती व प्रस्तावित प्रतिवादी क्र. ५ राजश्री गावडे यांना वादीने मुळ दाव्यातच समाविष्ट करायला हवे होते अशी हरकत घेतलेली आहे. महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुत दाव्यामध्ये अजुनदेखील मुद्दे निश्चित व्हायचे आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणा-या सर्व वादांचे एकाच दाव्यात निराकरण होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. प्रतिवादी यांनी दाव्याची आकारणी व कोर्ट फि याबाबत तसेच अन्य काही मिळकती वादीने समाविष्ट न केल्याबाबत जी काही हरकत घेतली आहे त्या हरकतीचा विचार गरज पडल्यास तसे मुद्दे काढुन अंतिम न्यायनिर्णयावेळी घेणे उचित ठरणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. नि. क्र. २१ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मंजूर झालेली दुरुस्ती वादींनी आजपासुन १४ दिवसांच्या आत निशाणी क्र.१ मध्ये करण्याची आहे.

३. वादींनी दुरुस्ती केल्यानंतर नव्याने समाविष्ट होणा-या प्रतिवादी क्र. ५ यांना दाव्याचे समन्स काढण्यात यावे.

४. प्रस्तुत अर्जाचा खर्च वादी ने सोसायचा आहे.

AMOGH PRABHAKAR KULKARNI
Digitally signed by AMOGH PRABHAKAR KULKARNI
Date: 2025.03.20 16:23:55 +0530

दिनांक – २०/०३/२०२५

(ए. पी. कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 20/03/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 20/03/2025 |
| Order uploaded on | --- | 20/03/2025 |